औरंगाबाद महामॅरेथॉनमध्ये विशेष ठसा उमटवण्यास धावपटू आतुर

मैदाने गेली फुलून : हजारो 'रनर्स' करीत आहेत कसून सराव

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : लोकमत समूहातर्फे १७ डिसेंबर रोजी महामॅरेथॉनची घोषणा होताच संपूर्ण महाराष्ट्रातील आपल्या आवडत्या महामॅरेथॉनमध्ये सहभागी होण्यासाठी प्रचंड उत्कटता निर्माण झाली आहे. लोकप्रियतेचे मैलाचे दगड पार करणाऱ्या या महामॅरेथॉनमध्ये आपला विशेष ठसा उमटवण्यासाठी महाराष्ट्रातील हजारो धावपटू तासन्तास कसून सराव करीत आहेत.

विशेष म्हणजे या महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग निश्चित करण्यासाठी पूर्ण महाराष्ट्रातील धावपटू, प्रतिष्ठित नागरिक, महिला आणि उदयोन्मुख खेळाडूंत चढाओढ निर्माण झाल्याचे चित्र आहे. गतवर्षी औरंगाबादेत झालेल्या अर्धमॅरेथॉनला क्रीडा रसिक, खेळाडू, ज्येष्ठ नागरिक व महिलांसह देश-विदेशातील धावपटूंचा जबरदस्त प्रतिसाद लाभला होता. अद्ययावत तंत्रज्ञानाचा पुरेपूर उपयोग झालेली ही अत्युच्च दर्जाची लोकमत समूहाची औरंगाबादमधील मॅरेथॉन असल्याची सहभागी धावपटूंची प्रतिक्रिया होती आणि यंदा होणारी महामॅरेथॉनदेखील आणखी सरस होणार असल्याचा विश्वास सहभागी होणाऱ्या धावपटूंमध्ये आहे. त्यामुळे १७ डिसेंबर रोजी होणाऱ्या महामॅरेथॉनमध्ये सहभागी होण्याची ओढ सर्वांमध्ये लागून राहिली आहे. विशेष म्हणजे या महामॅरेथॉनमध्ये सहभागी होऊन आपला विशेष ठसा उमटवण्यासाठी तासन्तास धावपटू कसून सराव करीत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील विविध शहरांतील रस्ते कसून सराव करणाऱ्या धावपटूंनी फुलून गेले आहेत. तशीच अवस्था त्या-त्या शहरातील मैदानावर आहे. मैदानावरही भल्या पहाटे हजारो धावपटू कसून सराव करीत असल्याचे चित्र आहे.

औरंगाबाद अर्धमॅरेथॉननंतर लोकमत समूहाने या वेळी महाराष्ट्रातील मोठ्या शहरांतही या महामॅरेथॉनची सुरुवात केली होती आणि तिची सुरुवात नाशिक येथून झाली. नाशिक येथेही धावपटूंचा प्रचंड प्रतिसाद लाभला होता. त्यानंतर औरंगाबादेत १७ डिसेंबर रोजी महामॅरेथॉन होणार आहे. त्यापाठोपाठ कोल्हापूरला पुढील वर्षी २८ जानेवारी आणि नागपूरमध्ये ११ फेब्रुवारी रोजी महामॅरेथॉनचा थरार रंगणार आहे.

औरंगाबादमध्ये रंगणारी ही महामॅरेथॉन मॅरेथॉन २१ कि.मी. अर्धमॅरेथॉन, फॅमिली रन (३ कि.मी.), ५ कि.मी. फन रन, १० कि.मी., २१ कि.मी. आणि डिफेन्स २१ कि.मी. अशा अंतराची असणार आहे. २१ कि.मी. अर्धमॅरेथॉन आणि १० कि.मी. अंतराच्या मॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या धावपटूंना टी शर्ट, गुडी बॅग, प्रमाणपत्र, फिनिशर मेडल, टायमिंग चीप व ब्रेकफास्ट देण्यात येणार आहे. ५ कि.मी. अंतरासाठी टी शर्ट, गुडी बॅग, मेडल व ब्रेकफास्ट, तर ३ कि.मी. अंतरासाठी गुडी बॅग, मेडल व ब्रेकफास्ट असणार आहे.

नावनोंदणीसाठी २ डिसेंबर अंतिम तारीख

लोकमत समूहातर्फे १७ डिसेंबर रोजी आयोजित महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग २ डिसेंबरपर्यंत निश्चित करता येणार आहे. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत करावी. या महामॅरेथॉनमध्ये शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रूपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

अधिक माहितीसाठी ९९२१०३०७००, ९१३०२३९४२५, ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. ऑनलाईन नोंदणीसाठी **www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.**

यंदा सर्व संरक्षक दले, पोलीस, होमगार्ड आणि विशेष राखीव दलातील धावपटूंसाठी दिले जाणार विशेष बक्षीस.

प्रत्येक शहरासाठी 6,00,000 हून अधिक रकमेची आकर्षक बक्षिसे

Circuit Run

Run Type	Cities	Invitation Price (Including GST)
21K	3 cities	₹2520
	2 cities	₹1920

Run Type	Cities	Invitation Price (Including GST)
10K	3 cities	₹2020
	2 cities	₹1540



#MahaMarathon /MahaMarathon

२५ नोव्हेंबरपूर्वी नोंदणी केल्यास विशेष सवलत

Distance	Regular Fee	Early Bird Fee (Before 15th Nov.)	Registration Fee Includes
3 KM Family Run (2 Adults + 2 Children (<12))	₹1200	₹960	Goodie Bag + Medal + Breakfast
5 KM Adult 12+	₹600	₹480	T Shirt + Goodie Bag + Medal + Breakfast
10 KM Adult 16+	₹950	₹760	T Shirt + Goodie Bag + Certificate + Finisher Medal + Timing Chip + Breakfast
21 KM Adult 18+	₹1200	₹960	T Shirt + Goodie Bag + Certificate + Finisher Medal + Timing Chip + Breakfast
Defense 21 KM	₹1200	₹800	T Shirt + Goodie Bag + Certificate + Finisher Medal + Timing Chip + Breakfast

लोकमत महामॅरेथॉन

औरंगाबाद 17/12/2017

कोल्हापूर 28/01/2018 | नागपूर 11/02/2018

स्पर्धा
- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

महत्त्वाचे

तलाठ्यावर कारवाई करण्याची मागणी

औरंगाबाद : कन्नड येथील तलाठी विकास वाघ यांनी जमिनीचे फेरफार करताना मुख्य वारसदारांची नावे घेतली नाहीत. त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याची मागणी मोहम्मद अकबर मोहम्मद जलाल यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निधन वार्ता

सय्यद नजीर

औरंगाबाद : साईनगर पिसादेवी

येथील रहिवासी सय्यद नजीर ऊर्फ बाबा (१०२) यांचे शनिवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली, असा परिवार आहे.

देवीचंद जाधव

औरंगाबाद : गिरनेरा तांडा येथील

रहिवासी, माजी ग्रामपंचायत सदस्य देवीचंद मंगाराम जाधव (७५) यांचे आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली, नातवंडे असा परिवार आहे. गिरनेरा तांडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

वैभव राठोड

औरंगाबाद : दशमेशनगर

ज्योतीनगरातील रहिवासी वैभव रसिकभाई राठोड (३२) यांचे शनिवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई-वडील, बहीण असा परिवार आहे. रविवारी राहत्या घरून दुपारी १२ वाजता अंत्ययात्रा निघून प्रतापनगरात अंत्यसंस्कार होणार आहेत.

मालतीबाई कुंटूरकर

औरंगाबाद : स्वातंत्र्यसैनिक

कॉलनीतील रहिवासी मालतीबाई बालकिशन कुंटूरकर (८३) यांचे वृद्धापकाळाने गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. मुक्तिसंग्रामातील स्वा.सै. बालकिसन ऊर्फ बाबूराव कुंटूरकर यांच्या त्या पत्नी होत.

निरखादेवी पाटणी

औरंगाबाद : निरखादेवी अनुपचंद

पाटणी यांचे अल्पशा आजाराने शनिवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली व नातवंडे, असा परिवार आहे. कैलासनगर स्मशानभूमीत रविवारी सकाळी अंत्यनिधी करण्यात येणार आहे.

त्र्यंबक लगामे

औरंगाबाद : त्र्यंबक अण्णासाहेब

लगामे यांचे वृद्धापकाळाने शनिवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. एन-११ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

६० पात्र मुलांना थेट रोजगार : पोलीस पाल्यांसाठी स्तुत्य उपक्रम

रोजगार मेळावा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : पोलिसांच्या मुलांना नोकरी मिळावी, यासाठी शहर पोलीस आयुक्तालयाकडून शनिवारी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात १३३२ युवकांनी सहभाग नोंदविला. कंपन्यांनी घेतलेल्या थेट मुलाखतीत साठ जणांची निवड करण्यात आली असल्याची माहिती पोलीस विभागाकडून देण्यात आली.



पोलीस आयुक्तालयाच्या वतीने टीव्ही सेंटर येथील पोलीस पब्लिक शाळेच्या मैदानावर शनिवारी (१८ नोव्हेंबर) सकाळपासूनच नोकरी मिळविण्यासाठी अनेक पोलीस बॉइज हजर होते. पोलीस विभागाच्या पुढाकाराने हा रोजगार मेळावा फक्त पोलीस बॉइजसाठी आयोजित करण्यात आला होता. या रोजगार मेळाव्याचे उद्घाटन पोलीस आयुक्त यशस्वी यादव यांच्या हस्ते करण्यात आले. पोलीस उपायुक्त दीपाली धाडे-घाटगे यांच्यासह अन्य पोलीस अधिकाऱ्यांचीही उपस्थिती होती. या मेळाव्यात औरंगाबाद, पुणे, नाशिकसह अन्य जिल्ह्यांतील ४३ कंपन्यांनी सहभाग नोंदविला होता.

या रोजगार मेळाव्यात १३३६ जणांनी नाव नोंदविले होते. या मेळाव्यात ७१० जणांची पहिल्या फेरीत निवड करण्यात आली. याशिवाय ६० जणांची अंतिम निवड करण्यात आली. पहिल्या फेरीच्या निवड प्रक्रियेत यशस्वी झालेल्या पोलीस बॉइजला आगामी फेरीसाठी बोलावण्यात येणार आहे, अशी माहिती पोलीस विभागाकडून देण्यात आली आहे.

यावेळी मेळावा यशस्वीतेसाठी उपायुक्त डॉ. दीपाली धाटे-घाडगे, सहा. पोलीस आयुक्त रामेश्वर थोरात, डॉ. अनिता जमादार, निरीक्षक कैलास प्रजापती, राजेंद्र कतुल, सहा. निरीक्षक श्यामकांत पाटील, अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

पोलीस टेन्शन फ्री असावेत...

पोलीस विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शहरात शांतता व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी सदैव तत्पर राहावे लागते. कर्तव्यात राहून कुटुंबाकडे लक्ष देण्यासाठी वेळ नसतो. शिक्षण मिळवून मुलांला नोकरी लागावी या चिंतेत पोलीस कर्मचारी असतात. अशा रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची काळजी काही प्रमाणात दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न असल्याची माहिती पोलीस आयुक्त यशस्वी यादव यांनी दिली.

उपसरपंचपदी अनिल चनघटे यांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

वाळूज महानगर : पिंपरखेडा-मेहंदीपूर ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी अनिल सुदामराव चनघटे यांची शनिवारी सभेत बिनविरोध निवड करण्यात आली.

या ग्रुप ग्रामपंचायतीची ७ ऑक्टोबरला निवडणूक होऊन ९ ऑक्टोबरला निकाल जाहीर करण्यात आला होता. ग्रामपंचायतीत एकूण ७ सदस्य असून, पिंपरखेडा येथील ५, तर मेहंदीपूर गावातून २ सदस्य विजयी झाले होते. सरपंचपदी सुवर्णा शिंदे या विजयी झाल्या होत्या. शनिवारी उपसरपंचपदाच्या निवडणुकीसाठी अनिल चनघटे, कल्पना कदम व रामकृष्ण गायकवाड या तीन सदस्यांनी नामांकनपत्र दाखल केले होते. कल्पना कदम, रामकृष्ण गायकवाड या दोघांनी अर्ज मागे घेतल्यामुळे चनघटे यांची बिनविरोध निवड झाल्याचे पिठासन अधिकारी व्ही. एस. पुरी व ग्रामसेविका व्ही. पी. जाधव यांनी जाहीर केले. यावेळी चनघटे यांचा ग्रामपंचायतीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

गुन्हेगारांवरील पोलिसांचा वचक संपला

चाकूहल्ला व लूट : नागरिकांत घबराट

लोकमत न्यूज नेटवर्क

वाळूज महानगर : गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक राहिला नसल्यामुळे वाळूज एमआयडीसीत लुटमार व हल्ल्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे व्यावसायिक व नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे.

वाळूज औद्योगिकनगरीत गुन्हेगारी कारवायांनी डोके वर काढल्याने व्यावसायिक व नागरिकांवर हल्ले करून लुटमारीचे प्रकार वाढले आहेत. चोऱ्या काहीअंशी घटल्या असल्या तरी इतर गंभीर गुन्ह्यांचा आलेख मात्र उंचावतोय याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आठवडाभरापूर्वी लांझी येथील संदीप भवार या व्यापाऱ्यावर पाळत ठेवून दुचाकीच्या डिक्कीतून ६ लाखांची रक्कम पळविली. ही घटना ताजी असतानाच गुरुवारी (दि.१६ नोव्हेंबर) सुपरवायझरवर चाकूहल्ला चढवत हल्लेखोरांनी ३ लाख ७२ हजार रुपये लुटले. घाणेगाव व रांजणगाव येथेही जमिनीच्या वादावरून हाणामाऱ्या करून प्राणघातक हल्ला केल्याच्या घटनाही याच आठवड्यात घडल्या आहेत. पाळत ठेवून लुटमार करणे, हाणामाऱ्या, छेडछाड, जमिनीचे वाद, अपहरण, दुचाकी चोऱ्या आदी गुन्ह्यांनी डोके वर काढले आहे. याचबरोबर अवैध दारू विक्री, वाळूची चोरटी वाहतूक बिनधास्तपणे सुरू आहे. स्थानिक डीबी शाखा मात्र सुस्त असल्यामुळे नागरिक व व्यावसायिकांत असंतोषाचे वातावरण पसरले आहे. विशेष म्हणजे औद्योगिकनगरीत पोलिसांची रात्रीची गस्त सुरू असतानाही गुन्हेगारी कारवाया थांबत नसल्यामुळे नागरिकांत उलटसुलट चर्चा सुरू आहे.

गतवर्षी या परिसरात गँगवारच्या घटनांमुळे गुन्हेगारांची दहशत पसरली होती. पोलीस प्रशासनाने गुन्हेगारांचे रेकॉर्ड तयार करून हद्दपार केल्याने गुन्हेगारी संपुष्टात आली होती. वाळूज औद्योगिक परिसर तसेच रांजणगाव, जोगेश्वरी, घाणेगाव, बजाजनगर आदी ठिकाणी लहान-मोठ्या चोऱ्या व हाणामाऱ्याचे प्रकार वाढले आहेत. वाळूज एमआयडीसी परिसरात लुटमार, प्राणघातक हल्ले व गंभीर गुन्ह्यांचे प्रकार वाढले असून, स्थानिक डीबी पथक गुन्हेगारी कारवाया रोखण्यात अपयशी ठरत असल्यामुळे नागरिक व व्यावसायिकांत उलटसुलट चर्चा सुरू आहे.

पान १ वरून

शिक्षकांच्या घोषणांनी शहर दणाणले

संघटनांचे अधिष्ठान न देता केवळ 'बदली हवी आंदोलन समिती' या माध्यमातून मोर्चाचे नियोजन केले होते. दिव्यांग शिक्षक, विधवा, परित्यक्ता, कुमारिका शिक्षिका, मतिमंद पाल्यांचे पालक, ५३ वर्षांपेक्षा जास्त सेवाज्येष्ठ शिक्षक, गंभीर आजारी शिक्षक, ३० किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावर कार्यरत पती-पत्नी, वर्षानुवर्षे दुर्गम भागात कार्यरत शिक्षक, विनंती बदली इच्छुक शिक्षक आदींना न्याय मिळवून देण्यासाठी २७ फेब्रुवारी रोजी जारी झालेला शासन निर्णय हाच उपयुक्त असल्याची भूमिका यावेळी मोर्चात सहभागी शिक्षकांनी व्यक्त केली. निवेदनाप्रमाणे १९ नोव्हेंबरपर्यंत बदली झालेल्या शिक्षकांच्या याद्या जाहीर करून त्यांना कार्यमुक्त केले नाही, तर सोमवारी २० नोव्हेंबरनंतर हे आंदोलन तीव्र करून साखळी पद्धतीने उपोषण करण्याचा इशारा बदली हवी आंदोलन समितीच्या समन्वयकांनी दिला. राष्ट्रगीताने मोर्चाचे विसर्जन करण्यात आले.

विधवांना न्याय देणारा शासन निर्णय

२७ फेब्रुवारीच्या शासन निर्णय हा निराधार विधवांना न्याय देणारा आहे. या निर्णयानुसार बदल्या झाल्यास शिक्षकांना सुरक्षित ठिकाणी सेवा करण्याची संधी उपलब्ध होणार असल्यामुळे प्रामुख्याने महिला शिक्षकांची हेळसांड थांबेल.

-मंगला मदने, मुख्याध्यापिका, पैठण

विस्थापित कुटुंबे एकत्र येत आहेत.

पती पैठण तालुक्यात, तर मी औरंगाबाद तालुक्यातील शाळेवर शिक्षक म्हणून कार्यरत आहे. दोन्ही शाळांतील अंतर ८१ किलोमीटर आहे. यामुळे प्रपंचात फार विस्कळीतपणा येत होता. या शासन निर्णयामुळे आशेचा किरण दिसला आहे.

-रंजना मते-गोर्डे, सहशिक्षिका, औरंगाबाद

दुर्गम भागातील शिक्षकांना न्याय मिळणार

वर्षानुवर्षे आम्ही दुर्गम भागात कार्यरत आहोत. त्यामुळे अशा भागातील कित्येक शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त राहतात. या निर्णयामुळे आम्हाला सोईस्कर ठिकाणी येण्याची संधी उपलब्ध झाली आहे. यातून विद्यार्थ्यांना शिक्षक मिळतील.

-लक्ष्मण गलांडे, सहशिक्षक, पैठण

बजाजनगरात तरुणाची आत्महत्या

लोकमत न्यूज नेटवर्क

वाळूज महानगर : बजाजनगरात

महाविद्यालयीन तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली.

नचिकेत मुकुंद जोशी (२०) हा आई-वडिलांसोबत बजाजनगरातील चिंचबन कॉलनीत वास्तव्यास असून, तो शहारातील स.भु. महाविद्यालयात बीसीएसच्या तिसऱ्या वर्गात शिक्षण घेत होता. शुक्रवारी रात्री नचिकेत याने आई-वडील व छोटा भाऊ यांच्या सोबत एकत्रितपणे जेवण केल्यानंतर सर्वजण घरात झोपी गेले होते. शनिवारी सकाळी ६.३० वाजेच्या सुमारास नचिकेत घरात दिसून न आल्यामुळे त्याचे वडील मुकुंद देशमुख यांनी दुसऱ्या रुममध्ये जाऊन पाहिले असता नचिकेत फॅनला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत त्यांना दिसून आला. त्यामुळे त्यांनी आरडा-ओरडा केला असता त्याची आई-भाऊ, तसेच शेजाऱ्यांनी त्या रुमकडे धाव घेतली. एमआयडीसी वाळूज पोलिसांनी नचिकेत यास बेशुद्धावस्थेत उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तपासून त्यास मयत घोषित केले.

पुढच्या जन्माच्या विचारापेक्षा देहदानातून याच जन्मात जगा

उपायुक्त वर्षा ठाकूर, अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर आणि उपअधिष्ठाता, तसेच शरीररचनाशास्त्र विभागप्रमुख डॉ. शिवाजी सुक्रे उपस्थित होते.

न्या. बोरा म्हणाले की, देहदान केलेल्यांच्या इच्छेला सन्मान देणाऱ्यांच्या सन्मानाचा हा सोहळा आहे. मृत्यूनंतर धार्मिक विधीसाठी या घाटावरून त्या घाटावर लोक जातात; परंतु चौथी शिकलेल्या माझ्या आईने ३२ वर्षांपूर्वी वडील गेले, तेव्हा कोणतेच धार्मिक विधी करू दिले नाही. ती म्हणाली होती, जिवंतपणी काय करायचे ते करा, मृत्यूनंतर काहीही नसते.

कोणताही विधी करू नका, दुःख करू नका. तिच्या इच्छेनुसार आम्ही तिचे देहदान केले. मानवी देह मृत्यूनंतरही समाजाच्या कामी येईल यासारखे दुसरे कार्य नाही. त्यामुळे प्रत्येकाने देहदानाचा संकल्प करावा आणि तो पूर्ण करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

नवल किशोर राम म्हणाले, मृत्यूनंतरही देहदानाच्या माध्यमातून समाजासाठी काहीतरी करण्याची संधीच मिळते; परंतु समाजातील विचारांमुळे डोक्यात ब्लॉक आहे. जनजागृतीच्या माध्यमातून तो दूर होईल, असे ते म्हणाले.

वर्षा ठाकूर, डॉ. शिवाजी सुक्रे यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. रश्मी बेंगाली यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रतिमा कुलकर्णी यांनी आभार व्यक्त केले.

मृतदेहाचा करा आदर

मृत्यूनंतर आपला देह विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी देणारी व्यक्ती महानच आहे. त्यामुळे मृतदेहाचा आदर करावा, कारण, त्या व्यक्तीने समाजाच्या प्रवाहाबाहेर जाऊन तुमच्यासाठी ते दान दिले आहे, असे डॉ. कानन येळीकर म्हणाल्या.

PLOTS FOR SALE
- Fully Developed Bungalow / Commercial plot 3500 sqft. at Shanoorwadi Beed By Pass Road Behind Bembde Hospital.
- Bungalow Plot 7000 sqft. at Kanchanwadi Nath Valley School Road ,next to Dakshin Vihar ,Paithan road.

CONTACT : NAGPAL GROUP,
Vivek – 9545451326 / 0240 -2333880

आज कितने पैसे लगेंगे उससे ज़्यादा कल कितने बचेंगे ये सोचो.
दूर की सोचो
0% व्याजदर डाऊन पेमेंट
BAJAJ FINSERV
7 Years Guaranty
*अटी लागू
आपली विज आपणच तयार करा !
भारतातील सर्वाधिक लोकप्रिय सुदर्शन सौर सोलार लाईटिंगमध्ये
On Grid Solar System
SUITABLE FOR : Hospital, Hotel, Industrial, Commercial, Residential
समझदारी की सोच! Sudarshan Saur
Subhadra Apartment, Ulkanagari, Aurangabad
Renuka Systems 9422712885, 9225302666

वाहन चालवीत असताना मोबाइलचा वापर करू नका.

मॉर्फिअस फर्टिलिटी मंथ
विनामूल्य IVF सल्ला ★ IVF @ 0% EMI* ★ विनामूल्य सोनोग्राफी
त्वरा करा ! मर्यादित स्पेशल ऑफर
(१५ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर)
१ लाख रूपयात दोन प्रयत्न आणि पहिल्या प्रयत्नातील औषधे मोफत *
मातृत्व होण्याची शक्यता दुप्पट करा*
DYC PLAN
वैद्यकीयदृष्टया सिध्द, कमी खर्चिक उपचार योजना
पहिल्या प्रयत्नात गर्भधारणा न झाल्यास दुसरे प्रयत्न मोफत केले जाईल*

Morpheus IVF
मातृत्व होण्याचे स्वप्न ! आता होऊ शकते पूर्ण !
मॉर्फिअस औरंगाबाद इंटरनेशनल आयव्हीएफ सेंटर
C/O. नोबल नर्सिंग होम, प्लॉट नं.-५३७, कामगार चौक, N-३, सिडको, औरंगाबाद- ४३१००३
संपर्क करा : 9422212011 / 9372002362 / 7798223249
www.morpheusivf.com

ज्योत सारीज्
लग्न खरेदीसाठी भव्य दालन
- डिझायनर
- घागरा-ओढणी
- पैठणी
- ब्रायडल
- वेडिंग गाऊन
- प्युअर सिल्क
सारंग सोसायटी, गजानन महाराज मंदिर मेन रोड, गारखेडा, औरंगाबाद, 0240-6565108

True Value The sign to trust
"जुनी कार खरेदी करण्याचे विश्वसनीय ठिकाण"
MARUTI SUZUKI Way of Life!
त्वरा करा आजचा शेवटचा दिवस
₹25,000 पासून कार उपलब्ध
स्पॉट बुकींगवर आकर्षक भेटवस्तू *
पगारिया मारुती ट्रू-व्हॅल्यू
मेगा प्री-ओन्ड कार उत्सव २०१७
दि. १७-१९ नोव्हें. १७, स.१० ते ७

Model	Qty.
Hyundai Santro	2
Mahindra Verito	1
Maruti Alto	5
Maruti Alto K10	3
Maruti Dzire	3
Maruti Swift	5
Maruti Wagon R	2
Maruti Zen	2
Tata Indigo	3
Tata Indica	2
Tata Vista	3

सर्व कंपन्यांच्या युज्ड कार्स उपलब्ध* | संपूर्ण पारदर्शी व्यवहार* | विश्वसनीय मार्गदर्शन*
ट्रू-व्हॅल्यू सर्टिफाइड कार्स उपलब्ध | ९०% पर्यंत अर्थसहाय्य* | त्वरित डिलेव्हरी*
नियम व अटी लागू*
पगारिया ऑटो Authorised Licence user of MARUTI TRUE VALUE
स्थळ : पगारिया टॉवर्स, अदालत रोड, औरंगाबाद
मोबाईल : 7387544111